# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी : ०२१७-२७४४७७१/७२/७३ (११ लाईन्स), Ext- १२५ फॅक्स : ०२१७-२३५१३०

संकेतस्थळ : www.sus.ac.in ई-मेल: phd@sus.ac.in

NAAC Accredited-2022
'B++ Grade (CGPA 2.96)

संशोधन विभाग | Research Section


संदर्भ क्र. पुअहोसोविसो/शै.सं.व.वि./संशोधन विभाग/२०२५/3682 दिनांक :- 13 MAY 2025

अत्यंत महत्वाचे

प्रति,
प्राचार्य/संचालक,
संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त संस्थो,
पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ,
सोलापूर.

**विषय :** संलग्नित महाविद्यालयातील संशोधन केंद्र मान्यतेकरीता आवश्यक नियमावली व संशोधन केंद्रावरील सोयी/सुविधांबाबत मार्गदर्शक नियमावली बाबत..

**संदर्भ :** मा. विद्या परिषदचा दि. २७/०३/२०२५ रोजीचा ठराव क्र. ०६

**महोदय,**

आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, मा. विद्या परिषदेच्या दि. २७/०३/२०२५ रोजी झालेल्या ठराव क्र. ०६ अन्वये संलग्नित महाविद्यालयातील संशोधन केंद्र मान्यतेकरीता आवश्यक नियमावली व संशोधन केंद्रावरील सोयी सुविधांबाबत मार्गदर्शक नियमावली या दोन्ही नियमावलीस मान्यता दिलेली असून सोबत नियमावली जोडली आहे.

उपरोक्त मान्य नियमावलीनुसार सर्व संलग्नित महाविद्यालयांनी पुढील प्रक्रिया करावी. सदर नियमावली सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणावी हि विनंती.

VP (Academics) / HoD Civil
- For records & N. A.
14/05/2025

N. B. Navale Sinhgad College of Engineering ★ Kegaon ★
Gen 249
Inward
Date 14/05/25
Sign

आपला स्नेहांकित,

(डॉ. यु.व्ही. मेटकरी)
उपकुलसचिव
संशोधन विभाग

**सोबत :** संशोधन केंद्र मान्यतेकरीता आवश्यक नियमावली व संशोधन केंद्रावरील सोयी सुविधांबाबत मार्गदर्शक नियमावली

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## संशोधन विभाग

## संशोधन केंद्र नियमावली

(Rules for Recognition of Research Centre)

१. संस्था/महाविद्यालयामध्ये संबंधित विषयाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम वर्ग सुरु असणे आवश्यक आहे.
२. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावलीनुसार मार्गदर्शक अथवा पीएच.डी. पदवीधारक असणे आवश्यक आहे.
३. संबंधित विषयासाठी स्वतंत्र विभाग/प्रयोगशाळा संगणक, फर्निचर, इन्टरनेटची सुविधा असणे आवश्यक आहे.
४. ग्रंथालयात संबंधित विषयाशी निगडीत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिके पुरेशा प्रमाणात व पुरेसे संदर्भ ग्रंथ असावेत.
५. INFLIBNET किंवा तत्सम ऑनलाईन संदर्भ मिळविण्याची सोय असावी. (सर्व विषयासाठी व Library & Information Science साठी)
६. सुसज्य जिमखाना असावा. (फक्त Physical Education विषयाकरीता)
७. संशोधन सुविधा केंद्राची मान्यता पाच वर्षासाठी देण्यात यावी.
८. पीएच.डी. कोर्सवर्क साठी अध्यापन व मार्गदर्शन करण्याची तसेच वेळोवेळी BOS किंवा परीक्षा विभागाकडून निश्चित केल्याप्रमाणे पूर्ण कराव्या लागणा-या अंतर्गत मूल्यांकनाची जबाबदारी संबंधित पीएच.डी. संशोधन सुविधा केंद्राची राहील.
९. पीएच.डी. संशोधन सुविधा केंद्रातील संशोधक विद्यार्थी व मार्गदर्शक यांना चर्चासत्रे/परिषदा/कार्यशाळा यासाठी पाठवावे व त्यासाठी आर्थिक तरतूद करावी. तसेच संबंधीत सुविधा केंद्रातील संशोधक मार्गदर्शकांस विद्यार्थ्यांच्या कच्चे प्रबंध सादरीकरणे, संशोधन सल्लागार समितीच्या बेटकीकरीता तसेच संबंधीत केंद्रातील विद्यार्थ्यांच्या पीएच.डी. संदर्भात करावयास लागणा-या प्रवासाकरीता TA/DA इत्यादीचा खर्च महाविद्यालयाने पीएच.डी. प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या जमा होणा-या फीच्या रक्कमेतून करावा.
१०. विद्यार्थ्याचे सहामाही प्रगती अहवाल व परीक्षा अर्ज व इतर गोष्टी संशोधक मार्गदर्शक व संशोधन सुविधा केंद्रामार्फत पाठविण्यात यावे.
११. पीएच.डी. संशोधन केंद्राच्या हिस्स्याचे शुल्क खालील दिलेल्या तक्त्याप्रमाणे असेल. उर्वरित रक्कम विद्यापीठास वेळोवेळी निर्देशीत केलल्या वेळेत जमा करण्याची जबाबदारी महाविद्यालयाची असेल. विद्यार्थ्याने निर्धारित वेळेत फी जमा केल्यास व महाविद्यालयांकडून विद्यापीट हिस्स्याची रक्कम भरण्यास दिरंगाई झाल्यास होणा-या दंडाची रक्कम विद्यार्थ्यांकडून वसूल करण्यात येवू नये.

सद्दस्थितीमध्ये शुल्काबाबत निर्धारित असलेली विद्यापीठ/महाविद्यालयाकरीता वितरण पध्दती पुढील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Items | Fee details |
|---|---|---|
| 1 | Admission fee | College |
| 2 | Registration fee | University |
| 3 | Laboratory fee (Science) | College |
| 4 | Laboratory deposit (Science) | College |
| 5 | Library fee (Yearly) | College |
| 6 | Internet fee (Yearly) | College |
| 7 | Library Deposit (One time) | College |
| 8 | Tuition fee (Yearly) | College- 70%<br>University- 30% |
| 9 | Lab Development fee (Yearly) | College |
| 10 | Gymkhana fee (Yearly) | College |
| 11 | Medical Charges (Yearly) | College |
| 12 | Student Aid Fund (Yearly) | University |
| 13 | Yuvak Mahostav (Yearly) | University |
| 14 | Apatkalin Nidhi (Yearly) | University |
| 15 | Ashwamedha fee (Yearly) | University |
| 16 | University Devlp. Fund (Yearly) | University |
| 17 | Pro-Rata | University |

# GUIDELINES FOR WORKING OF RESEARCH CENTRE

## Ph.D. अभ्यासक्रम संचलित संशोधन केंद्र मार्गदर्शक नियमावली

१. महाविद्यालयाने Ph.D. कोर्ससाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षात आर्थिक तरतूद करावी.

२. महाविद्यालयाने संशोधन विद्यार्थी व मार्गदर्शक यांची बैठक वर्षातून किमान दोन वेळा मा. प्राचार्य यांच्या अध्यक्षेतखाली आयोजित करावे व त्याचे रेकॉर्ड ठेवावे.

३. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे Ph.D. कोर्सवर्क परीक्षेसाठीचे परीक्षा अर्ज परीक्षा विभागाने दिलेल्या विहित मुदतीत परीक्षा विभागाकडे सादर करावे.

४. महाविद्यालयाने संशोधक विद्यार्थ्यांस पुस्तके, संशोधनपर मासिके तसेच इंटरनेट, Inflibnet ची उपलब्ध करुन द्यावी. तसेच संशोधनासाठी प्रयोगशाळा/खोली उपलब्ध करुन द्यावी.

५. मार्गदर्शकाने संशोधक विद्यार्थ्यास महाविद्यालयात संशोधन केंद्र वरच कार्यालयीन वेळेत मार्गदर्शन करावे.

६. संशोधन केंद्रावर संशोधक, विद्यार्थी त्यांच्या संशोधनासाठी भेट देईल. त्यावेळेस त्याची हजेरी संशोधन सुविधा ठिकाण येथे/केंद्रावर ठेवावी. सदरची हजेरी विद्यापीठाने मागणी केल्यास विद्यापीठाकडे सादर करावी.

७. मार्गदर्शक व संशोधक विद्यार्थी यांच्यात गंभीर मतभेद निर्माण झाल्यास त्याबाबतीत संबंधित विषयाच्या अधिष्ठाता व मा. प्र-कुलगुरू यांचा निर्णय अंतिम राहील.

८. महाविद्यालयाने विद्यापीठाच्या नियमांचे उल्लंघन केल्यचे निदर्शनास आल्यास चौकशी अंती संशोधन सुविधा, केंद्र/ठिकाणाची मान्यता काढून घेण्याचे अधिकार विद्यापीठाकडे राहतील.

९. पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी संशोधन सुविधा केंद्र मंजूर केलेली आहेत.

१०. विद्यापीठाच्या SU-PET/ National Entrance परीक्षेस बसून (विद्यापीठाची प्रवेशप्रक्रिया पूर्ण करून) पात्र झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या संशोधन केंद्र येथे प्रवेश घेण्यासाठी प्रवेश पत्र दिले जाईल. सदरच्या प्रवेश पत्रामध्ये नमुद केलेल्या सर्व सूचना वाचून घेऊन त्याची अंमलबजावणी करणेची जबाबदारी संबंधित महाविद्यालय व विद्यार्थी यांची राहील. विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज हे विद्यार्थ्यांने आपल्याकडे प्रवेश घेतल्या दिवसापासून एक महिन्यामध्ये सादर करावा तद्नंतर विद्यापीठ नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

११. विद्यार्थ्याने Ph.D. प्रवेशासाठी विद्यापीठाकडून प्रवेश पत्र मिळाल्यानंतर संबंधित संशोधन सुविधा केंद्र /महाविद्यालयामध्ये संपर्क साधून नियमाप्रमाणे प्रवेश फी भरुन प्रवेश घ्यावा.

१२. प्रवेश घेतल्यानंतर सदर विद्यार्थ्यास संबंधित महाविद्यालयाने ओळखपत्र/बोनाफाईड प्रमाणपत्र मागणी प्रमाणे दयावे.

१३. Ph.D. अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या कोणत्याही विद्यार्थ्यांस थेट चौकशीसाठी अथवा इतर कामासाठी विद्यापीठातील संशोधन विभागामध्ये पाठवू नये. विद्यार्थ्यांच्या अडचणीची सोडवणूक महाविद्यालयाच्या संशोधन केंद्र येथेच करावी. तद्नंतर काही अडचणी असल्यास संबंधित प्राचार्यानी लेखी स्वरुपात सदरची अडचण विद्यापीठ कार्यालयास कळवावे व मार्गदर्शन घ्यावे.

१४. प्रवेश घेतल्यानंतर संबंधित विद्यार्थ्याने तो ज्या भारत सरकार शिष्यवृत्तीसाठी पात्र आहे त्याचा फॉर्म इंटरनेटवर समाज कल्याण खात्याच्या वेबसाइटवर भरुन त्याची प्रत मार्गदर्शकाची स्वाक्षरी घेऊन संबंधित संशोधन केंद्र/महाविद्यालय येथे सादर करावा. सदरचा अर्ज महाविद्यालयाच्या प्राचार्यानी तपासून मंजुरीसाठी समाज कल्याण कार्यालयाकडे नियमाप्रमाणे पाठवावा.

१५. शिष्यवृत्ती बाबत काही शंका/अडचणी आल्यास संबंधित विद्यार्थी व संशोधन केंद्र /महाविद्यालय यांनी समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधून त्याची सोडवणूक करावी.

१६. प्रत्येक विद्यार्थ्याने त्याचे सहामाही प्रगती अहवाल संशोधक मार्गदर्शक याची स्वाक्षरी घेऊन संबंधित महाविद्यालयामध्ये जानेवारी/जुलै महिन्यामध्ये सादर करावा. महाविद्यालयाने संशोधन सल्लागार समितीच्या (RAC) बैठका जानेवरी / जुलै मध्ये आयोजित करून प्राप्त झालेले सर्व सहामाही अहवाल संशोधन व मान्यता समितीसमोर ठेवून फेब्रुवारी/ऑगस्ट मध्ये विद्यापीठ संशोधन विभागास एकत्रितपणे सादर करावेत.

१७. विद्यार्थ्यांने विहित वेळेमध्ये सहामाही प्रगती अहवाल न दिल्यास त्याचेकडून नियमाप्रमाणे दंडाची आकारणी करून प्रत्येक सहामाही अहवालासाठी सदरची रक्कम एकत्रितपणे विद्यापीठ कार्यालयामध्ये जमा करावी. विद्यार्थ्याने प्रवेश घेताना जमा केलेली फी मधील विद्यापीठाचा हिस्सा सर्व विद्यार्थ्याच्या प्रगती अहवाला सोबतच ०५ फेब्रुवारी/०५ ऑगस्ट पर्यंत यादीसह एकत्रितपणे सादर करावा.

१८. संशोधन केंद्र/महाविद्यालय यांनी फी ची रक्कम विहित वेळेमध्ये न भरल्यास नियमाप्रमाणे संबंधित महाविद्यालयाकडून दंडाची आकारणी करण्यात येईल.

१९. संशोधक विद्यार्थ्यांचे संशोधन पूर्ण झाल्यानंतर त्याचा प्रबंध स्विकारण्यासाठीची फी विद्यापीठामध्ये भरुन घेतली जाईल. सदरचा प्रबंध संशोधन केंद्र/महाविद्यालय येथून रितसर ना-हरकत/नादेय प्रमाणपत्रासह महाविद्यालयाच्या लेटरहेडवर पत्र देऊन सादर करावा.